**<u>दिवाणी किरकोळ अर्ज क. 660/2022 मधील नि.1 वरील आदेश</u>**
**शिवाजी जगताप <u>व इतर विरुध्द निरंक</u>**
**<u>CNR NO.MHBIO8001546-2022</u>**

1. प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने बॉम्बे रेग्युलेशन 1827 चे कलम 2 अन्वये वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केला आहे.

2. **<u>अर्जदारांच्या अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे.</u>**

अर्जदार हा मयत लिंबाजी पि.केशुबा जगताप यांचा मुलगा असुन अर्जाच्या परिच्छेद क्र.6 मधील अर्जदार क्र.1/1 ही मयताची सुन (मयताचा मयत मुलगा कल्याण पि.लिंबाजी जगताप याची पत्नी) असुन अर्जदार क्र.1/2 हा मयताचा नातु (मयताचा मयत मुलगा कल्याण पि.लिंबाजी जगताप याचा मुलगा) आहे. मयत लिंबाजी पि.केशुबा जगताप यांचा मृत्यू **दि. 14.03.2022** रोजी झालेला आहे. अर्जदाराची आई/मयताची पत्नी पाच वर्षापुर्वी मयत झालेली आहे. अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे, अशी विनंती केली आहे.

3. प्रस्तुत प्रकरणात आक्षेप मागविण्यासाठी दि. 20.10.2022 रोजी दै.पार्श्वभुमी (नि.क्र.8) या वृत्तपत्रात जाहीर प्रगटन दिले होते. तसेच तहसील कार्यालय, माजलगाव आणि ग्रामपंचायत कार्यालय, सावरगाव, ता.माजलगाव जि.बीड येथे देखील जाहीर प्रगटन डकविण्यात आले होते, परंतू कोणीही आजपर्यंत आक्षेप नोंदविला नाही.

4. अर्जदारांतर्फे अर्जदार शिवाजी लिंबाजी जगताप यांनी त्यांचे अर्जातील कथनाच्या पुष्ठयर्थ पुराव्याचे शपथपत्र (नि.क्र.9), ग्रामपंचायत कार्यालय, सावरगाव, ता.माजलगाव यांनी दिलेले मयताचे मृत्यू प्रमाणपत्र नि.क्र.04 सोबत, अर्जदार यांचे आधारकार्डच्या पडताळणी केलेल्या प्रती, मयताचा मुलगा कल्याण लिंबाजी जगताप याचे मृत्यू प्रमाणपत्राची तसेच वारस प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत तसेच अर्जदार यांचे पेपरमधील जाहीर प्रगटन केल्याची प्रत नि.क्र.8 अशी कागदपत्रे दाखल केली आहेत, जी अर्जातील कथनांशी सुसंगत व समर्थनीय आहेत.

5. अर्जदारांच्या वारसाबद्दल कोणीही हरकत घेतली नाही. त्यामुळे अर्जदार आणि

अर्जाचे परिच्छेद 6 मध्ये दर्शविलेले अर्जदार क्र. 1/1 व 1/2 हे मयताचे वारस असल्याचे दिसुन येत आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## **आदेश**

1) प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात येतो.
2) अर्जदार शिवाजी पि.लिंबाजी जगताप आणि अर्जाच्या परिच्छेद क्र.6 मध्ये दर्शविलेले अर्जदार क्र.1/1 कालींदा कल्याण जगताप आणि अर्जदार क्र.1/2 कैलास कल्याण जगताप, सर्व रा. सावरगाव, ता. माजलगाव, जि.बीड हे मयत लिंबाजी पि.केशुबा जगताप यांचे कायदेशीर वारस आहेत असे घोषित करण्यात येते.
3) आवश्यक ती कोर्ट फिस दिल्यानंतर वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

RAHUL BALBHIM POL

Digitally signed by RAHUL BALBHIM POL
Date: 2023.01.20 17:20:16 +0530

**( आर. बी. पोळ )**
तिसरे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, माजलगाव.

दिनांक : 20.01.2023.
ठिकाण : माजलगाव.

CERTIFICATE

"I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Judgment/order".

Dictated on : 20/01/2023

Transcribed on : 20/01/2023

Checked & signed on : 20/01/2023

Sd/-

Date: 20/01/2023

S.M.Mandavkar

Marathi Stenographer

3rd Jt. Civil Court J.D.Majalgaon.